speed of the wind. At about 2.00 p.m. there was some slow-down in the speed of the wind and the rain also stopped. Since there was no scope for getting any food from the hotel management, some of our colleagues went outside and they were successful in buying a loaf of bread and four small sachets of fruit jam. There was lot of rush in the bakery and within a short period the shop ran out of stock. One bread was shared between four of us. In the afternoon no tea could be made available by the hotel as everything by that time went out of order in the city. Obviously, the electricity also went off and since evening we were sitting in the dark. The mobile network also disrupted and as a result we were not able to contact any body, neither local nor outstation.To add to the agony water got completely exhausted at about 2 p.m. When I enquired with the manager he explained that there was no water in the overhead tank as the PVC pipes supplying water to the rooms got completely broken. The overhead solar system supplying hot water to the entire hotel also collapsed completely causing huge loss to the hotel owner. As a result of this, there was severe problem of going to the wash room. I restrained myself from drinking even little water so as to avoid use of wash room. Due to squally winds it was also risky to go out of the hotel.

At about 8 p.m. the hotel management was able to serve 3 'Idlis' and 'chutney' to each one of us on a piece of paper. Throughout the night strong winds were howling across the city. We were not able to get sound sleep and the night was passed anxiously without knowing when the cyclone was going to stop.

Fortunately, the cyclone stopped completely at about 6 a.m. on Monday (the 13th Oct.). Right from 6 a.m. every body started gathering in the reception room of the hotel. Some of the other passengers staying in the hotel started making complaints about no provision of tea, water, electricity and so on. It is really disgusting that those passengers were not able to understand the seriousness of the damage that had taken place. It was beyond the capacity of the hotel manager to arrange for any small thing as everything was out of order and the situation was beyond anybody's control.At about 9 o'clock the manager came and he told me that they had a bore well, but due to damage of the PVC pipes it was difficult to supply the water to all the rooms. He managed to get a plumber after sometime but he was helpless as the plumbing-material like pipes etc. was not available due to closure of the shops. Further, due to non-availability of diesel the generator could not be put on. In the meanwhile I went to adjacent two hotels to enquire whether water is available there so that our morning rituals could be carried out. However, none of the hotels was having water storage. Later the manager, anyhow, managed to bring 10 liters of diesel and started the generator. As a result, the rooms located on one side of the hotel started getting water. So, we were fortunate to get at least some water to do our morning rituals.

At 11 a.m. we went out to see what was the situation. On the way to the 'Vizag Railway station we observed that hundreds of trees had fallen and roads were blocked completely. Trees were looking like half broken match sticks. 'NDRF' teams were busy in clearing the roads.The electric poles also had been uprooted. On railway station a large number of passengers had stranded and huge damage had been caused to the railway station. In the city, some of the old houses were damaged and shops were found crowded. The entire city was victim of the calamity and it was very difficult to anticipate when the city would come to normalcy.

Fortunately, some food was arranged by the caterer at about 2 p.m. The office-bearers S/Shri A. Ramesh Babu, V. Narsayya and Ramana were kind enough to call on us and they were trying their best to see our well being & comfort, forgetting the problems which they were facing on their 'home' fronts. **All of us place on record our deep gratitude to all of them who helped us during our stay in Vizag.**

On 12th October in the afternoon at 4.30 p.m. the AGM took place in the lounge of hotel and it concluded at 6.30 p.m. On Tuesday morning we were able to get the newspaper viz. 'Times of India' through which we came to know the seriousness of the havoc done by the 'cyclone' which touched the speed of 200 kmph. As per original plan we were to leave for Mumbai by 9.00 a.m. flight on 13.10.2014. After knowing that the Airport could not be put in order for at least another 8 days, we took a decision to go to Hyderabad by a taxi. The hotel manager was able to arrange a taxi for six of us (including two from Bhopal Circle) and after negotiating for a reasonable taxi-fare we left Vizag at 11.15 a.m. and reached Hyderabad at about 11.30 p.m. (distance about 660 kms) on the same day. We were able to stay overnight in the Bank's guest house at Hyderabad and on 15.10.2014 we landed safely by Air in Pune/Mumbai.

When I was thinking about all this, I felt that this was a unique experience for all of us who attended the GB/AGM of the Federation and we had been there only to witness & experience the Cyclone "HUDHUD".

**Vilas Gandhe**
Secretary, SBI Pensioners' Association Mumbai Circle (Pune)
Mob: 09371218775

*************************************************************************************************

## On Federation Front

Our Federation's Governing Body & General Body meetings were scheduled to be held on 11th and 12th October 2014 respectively at Visakhapatnam. Though the Governing Body meeting could be held as shceduled, the schedule of AGM was disturbed due to 'Hudhud' cyclone as described above and the AGM could be held in adverse weather conditions on 12th in the evening. Our Federation has reported about the 'Hudhud' cyclone and the brief details about the proceedings of GB and AGM of the Federation in the Editorial of 'Elders Voice', a house magazine of Chennai Circle Pen. Association. We reproduce the excerpt of the Editorial which gives some details about our W.P. No.1875/2013 and the negotiations for 10th Bipartite Wage Settlement with IBA for information of our members.

"Thanks to the efforts of the organizers of the host Hyderabad Circle Pensioners' Association, both the meetings of the Governing Body and General Body of the Federation could be held at Visakhapatnam and the developments in the W.P. pending before the Delhi High Court and improvements in the Medical and other facilities provided by our Bank could be discussed. With the final hearing of the W.P. of our Federation remaining partly by Delhi High Court and the next hearing posted to 14-10-2014, expectations of an early verdict rose high. However, the hearing listed on 14-10-2014 could not take place and the next hearing is posted to 27-11-2014.

As the pleadings are complete and the W.P. is being taken up for final hearing, the Delhi High Court is expected to give its verdict shortly, subject to of course the Respondents not indulging in prolonging the litigation further. The man made laws are such that they could be subjected to the manipulations by the mighty and powerful. The aged SBI pensioners can never match the mighty power of the Respondents of their W.P. We are facing insurmountable hurdles and inordinate delays even in securing justice from our judicial syatem. We are much agitated over the inordinate delay in securing justice. Unfortunately, we cannot have our way as we wish to have. Efforts are in our hands but results are not. We are, however, hopeful that our judiciary would render justice to us without further delay, in view of the directions issued by the Supreme Court for the disposal of our W.P. within six months.

A stalemate appears to have taken place in negotiations for 10th Bipartite Wage Settlement with IBA keeping its offer of only 11% increase over the pay slip cost as against 25% sought by UFBU. In regard to 100% neutralization of

Dearness Relief to pre 1-11-2002 retirees, it appears that IBA is willing to consider favourably. But on providing family pension at 30% of pay to all, IBA proposes to consider after working out the cost involved. The above two improvements should have already been granted to the pensioners / family pensioners of all Banks following these improvements provided by Reserve Bank of India as per the terms of settlements dated 29-10-1993 entered between IBA and the Unions of Workmen Employees and Associations of Officers. The need for negotiations on these issues with IBA should not have arisen, as the provisions of the Eighth Bipartite Settlement denying 100% neutralization of Dearness Relief to pre 1-11-2002 pensioners are obviously discriminatory and do not have any justification. The negotiations so far held have given rise to the possibility of providing updation of pension, as IBA has been reported to be willing to consider modified proposals in this regard.

The offer of only 11% increase in pay scales is very low and UFBU is therefore compelled to launch an agitation. It is very unfortunate that the Bank employees are not adequately recognized for their services rendered for the benefit of all sectors of our economy. The fact that they could help in opening more than 5 crore accounts so far under the 'Jan Dhan Scheme' of the Government recently being implemented is a proof of the commitment of the Bank employees in implementing the Schemes of the Government. Even the demand of 25% increase may not place the salary scales of Bank employees on par with the salary scales of the Government employees. This disparity is bound to increase when the recommendations of Seventh Pay Commission already constituted are implemented. Let us hope that all possible steps will be taken to avoid industrial unrest in the most important Banking Sector vital for implementing the various programmes of the Government.

(The issues deliberated upon for representing to our Bank and the Resolutions passed by the General Body of our Federation are published on page numbers 17 & 18)

## अभिनंदनीय

नागपूर येथील आपले सभासद श्री.अनिल पिंपळापुरे यांची नात (मुलीची मुलगी) कु.निधी मिलींद आळशी ही २०१४ च्या बारावीच्या परीक्षेत ९१.३८ % गुण मिळवून प्राविण्यासह उत्तीर्ण झाली. त्याबद्दल तिचा नागपूर क्लबतर्फे बँकेचे निवृत्त डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री.एस.एस.रंजन यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. कु.निधीच्या या स्पृहणीय यशाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन.

**********

पुणे येथील आपल्या फॅमिली पेन्शनर सभासद श्रीमती विजया अ. देशपांडे यांची नात कु.अनिशा मिजार हिने कुर्डुवाडी (सोलापूर) येथे नुकत्याच पार पडलेल्या पुणे जिल्हा विभागीय शालेय रोप-मल्लखांब स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावले. याबद्दल असोसिएशतर्फे कु.अनिशाचे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**

### Medical Camp held at Thane

A Medical Check-up Camp was organized on 12th November 2014 at SBI Naupada, Thane Branch. The Notice of the Camp was published in the October issue of 'Samvad' for information of all the members. However, it was disappointing to mention that only 25 Pensioner members attended the Camp, as against nearly 400 SBI Pensioners reside in and around Thane. Members should note that we organize such medical check-up camps for the benefit of members and they are expected to get benefit of such medical check-up camps which will enable them to take care of their health at their advanced age.

**- Secretary, Thane Unit**

## प्रतिसाद

'संवाद'चा सप्टेंबर २०१४चा अंक मिळाला. या अंकातील सर्वश्री प्रभाकर कानिटकर, माधव नाडकर्णी, सौ. सुषमा तिळवे, अरुणा नगरकर, सौ.उज्ज्वल ब्रह्मांडकर यांच्या कविता मनाला भावल्या. सौ.संध्या परदेशी यांचा 'माझी समाजसेवा - इच्छा आणि कार्य' हा पारितोषिक विजेता लेख अंत:करणाचा ठाव घेणारा असाच आहे. 'संवाद' नेहमीच वाचनीय असतो त्याबद्दल संपादक मंडळाचे अभिनंदन.

**चंद्रकांत मोहिते (मिरज)**

## The Resolutions on the Issues to be taken up with our Bank adopted by the Annual General Body Meeting of the Federation held on 12th Oct. 2014 at Visakhapatnam

The Annual General Body of our Federation resolved to appeal to the Corporate Centre of our Bank to consider the following requests favourably.

i) To arrange for extension of the benefit of updation of pension on every revision of salary on the same basis as is done by the Central Government to its employees.

ii) To arrange for the revision of the family pension at 30% of pay to all and revise the minimum family pension at Rs.1,000/- p.m.

iii) To arrange for payment of improved pension and family pension to all those aged 80 and above on the same basis as paid by the Government.

iv) Pending the revision of family pension at 30% of pay to all, to arrange for the revision of family pension of pensioners retired between 01-11-1987 and 01-11-1992 / 01-07-1993 on the basis of revision of family pension made in January 2008 with suitable increase in minimum family pension now being paid on the Fourth Bipartite Pay scales.

v) To arrange for applying the same formula adopted under the Industry Level Pension Scheme for the commutation under our Pension Scheme.

vi) To arrange for payment of enhanced gratuity up to Rs.10 lacs to all those retired from 01-01-2006 to 23-05-2010 by sustained follow-up with the Government.

vii) To arrange for revising minimum pension corresponding to the revision made on the basis of industry level pension settlement.

viii) To request our Bank to arrange for immediate review and modification of its REMBS if necessarry by making additional contribution to the Corpus of REMBS as under.

(a) Enlarging the eligible diseases to cover all ailments in particular Gynecological Diseases, Hysterectomy, Asthma, ENT, Neurological disorders, Removal of Kidney Stones and Bronchial disorders requiring hospitalization and

(b) Making the scheme eligible for meeting the medical expenses incurred on domiciliary / hospitalization treatment under alternative system of medicines like Ayurved, Siddha, Homoepathy, Acupuncture, Acupressure and Unani.

(c) Extending the coverage of the recently improved Medical Benefit Scheme to all those retired before attaining the age of 60 years, including the VRS and Exit option retirees with a stipulation to avail of the benefits on attaining the age of 60 years.

(d) Extending the coverage of 20 ailments to the members of Scheme-I and II with Domiciliary facility.

(e) Making all members of REMBS-I eligible for admission to improved REMBS-II.

(f) Extending the benefits of the REMB Scheme to the disabled children, widowed daughters and dependent parents.

(g) Providing for the hospitalization treatment including the Domiciliary facility for the treatment of all terminal illness and

(h) Making the Scheme eligible for admission of the family pensioners by accepting applications from them, after the death of their spouses, while in service or after retirement.

(i) To consider making improvements in the REMBS for providing the maximum cover of Rs.20 lacs to all cadres of pensioners willing to pay the prescribed contribution and increasing the domiciliary facility from 10% to 20%.

(j) To delegate the authority for approving the hospitals and dispensary, as per the

norms stipu;ated by the Bank to LHOs

(k) To put in place adequate mechanism for monitoring the proper functioning of the dispensaries with appointment of permanent part time doctors.

(l) To ensure availability of funds with timely and adequate allocation of funds necessary for prompt payment of bills under REMBS.

(m) To arrange for publication of a booklet incorporating the facilities including loan facilities and concessions provided by our Bank to the pensioners / family pensioners of our Bank for circulation to the pensioners and also to the staff at the operating levels, most of whom are not aware of the eligible facilities provided by our Bank to the pensioners / family pensioners.

ix) To provide one more opportunity to the VRS / Exit option retirees, who have not paid the arrears of subscription to MWF up to 60 years of age within six months from the date of retirement and make them eligible for availing of the benefits of the Scheme on attaining the age of 60 years.

x) To recognize the Federation and Associations of Pensioners and provide office accommodation and other facilities to our Federation and its Affiliates in all Circles to enable them to provide the various services required by past employees of our Bank.

xi) To restore the concession of the additional interest at 0.50% p.a. on the deposits of Senior Citizens.

xii) To provide the overdraft facility exceeding Rs.3 lacs granted to pensioners of our Bank against their deposits at the same rate charged for the overdraft less than Rs.3 lacs.

xiii) To arrange for providing the concessionary facilities including interest on secured advances like Gold Loan being extended to the serving staff by our Bank, to pensioners and family pensioners by the Bank by making suitable changes in its Core Banking software packages.

xiv) To arrange for providing Locker facilities to pensioners and family pensioners of our Bank with same terms without any limit on the number of operations as provided to the serving staff.

xv) To arrange to extend the facility of interest free festival advance provided to the serving employees to the pensioners of our Bank to enable them to meet the expenses for celebrating the festivals.

xvi) To provide the same concessionary rate of interest at 8.00 % p.a. instead of the rate applicable to public on the Educational Loans granted to the children of the employees, while in service, after the retirement of the employees.

xvii) To arrange for establishing its dispensaries at all eligible centres and District head quarters with adequate stock of standard medicines, for meeting the requirements for this purpose and to adopt a uniform procedure for the selection by the appointment of committee consisting of the Bank's Chief Medical Officer (Not Civil Surgeon) and one or two Officials of the Bank for appointment of Doctors at the dispensaries.

xviii) To arrange for the review of REMBS of

e-SBS and e-State Bank of Indore and provide for the same medical facilities provided by State Bank of India to the pensioners of e-SBS and e-State Bank of Indore.

(*Courtesy - October 2014 issue of 'Elders Voice', a monthly magazine of Chennai Circle Pensioners' Association*)

******************************************

## कवितेस

माझ्या मनाच्या घरात
आताशा तू येत नाहीस
उंबरठ्याशी जरा थबकून
पाठ फिरवून माघारी जातेस
माझ्या भावनांच्या देहावर
शब्दांचं पांघरूण घालत नाहीस
उघड्यावर देह घरी सोडून
जवळीक दुरून साधत नाहीस
आता मनाच्या माझ्या घरी
मी कधीचा एकटा आहे
सारे शेजारी जिवलग आप्त
सोडून एकटा राहात आहे
आता घरात तू कधीही ये
मीच माझा सोबती आहे
न अडखळता उंबऱ्यामध्ये
तडक मला भेटायला ये.
भावनांच्या कुडीला आता
शब्दांची शाल हवी आहे.
कविते तुझ्या मिठीत मला
आयुष्याची ऊब हवी आहे

८८/१४

**आर. जी. कडवेकर**
मो. ९३७२६७३९८४

## घरचं खाऊ

"कुठे जायचय आपल्याला?"

"अगं...त्या मध्याच्या सेंडऑफ पार्टीला-त्या लॉजच्या लॉनवर...."

"शी बाई....मी नाही तिथलं काही खाणार! आम्ही मैत्रिणी गेलो होतो त्या हॉटेलमधे एकदा. शी: ऽ ऽ कसलं ते बेचव-कच्च-दुरडं खाणं!" आपण घरीच जाऊ...काही तरी करते मी! तुमच्या मध्याला सांगा काहीबाही कारण!

"ठीक! चला घरी म्हणत त्याने गाडी घराकडे वळवत म्हणाला "तू म्हणतेस ते ठीकच आहे-असलंच काही खायचे असेल तर त्या हॉटेलात कशाला? घरी मिळतचं की तू करतेस तसलं काही बाही!" **मधू रानडे, नाशिक**

* * * * * * * * * * * *

## भविष्य

ज्योतिषी (विद्यार्थ्यास) : तुला खूप शिक्षण आहे. तू खूप शिकून मोठा होशील, भरपूर पैसे कमावशील.

विद्यार्थी : ते बरोबर आहे. पण मी पास कधी होणार? हे अगोदर सांगा.

**पुरुषोत्तम देशपांडे, अमरावती**
**मो. ९७६४९७४४२२**


*SPECIAL FESTIVAL OFFER,*

**FOR ALL YOUR INTERNATIONAL COURIER NEEDS**

***Universal Courier***

*We bring the universe at your doorstep*

*SINCE 1992*

*IATA CERTIFIED*

***An Organization run by SBI pensioners***

***Mr. J. N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation***

**Offering wide range of services for worldwide such as Express Courier, Airfreight Door to Door as well as Airport to Airport, Import/ Export custom clearance & free pick-ups from anywhere in Mumbai. Expertise in dealing with Foodstuff & personal effect shipments for worldwide.**

*Specialize for: UK, Dubai, USA, CANADA, and AUSTRALIA & AFRICA.*

***Contact: Mr.Biren Sethia - 9820338233, Mr.Mahesh Kamerkar - 9820316152, Pushpendra Tiwari -9870198118/9321026630 & Kajal - 8879140670***

**Landline: 022 - 26821072/74**

E-mail: sales@ucglobal.com & mahesh.k@ucglobal.com

Website: www.ucglobal.com

***HO:** 1 & 2 Skylark, Next to Kamgar Kalyan Bhawan, Near BMC office, Azad Road, Andheri East, Mumbai – 400069*

लघुकथा

## लाईफ इज ब्यूटिफुल! -

काल रात्रभर वारं असावं, म्हणून जरीनने घरांच्या दारात, नव्याने लावलेल्या मंजूळ घंटा वाऱ्याच्या झोतात किणकिणत होत्या. रात्री त्या आवाजामुळे तिची झोप जागृत झाली होती. खरं म्हटलं तर, मंजूळ घंटेचे एक निमित्त होतं. परंतु झोप उडण्याचे खरं कारण म्हणजे नव्या नवसाने जन्मलेल्या डायनाचा पहिला वहिला वाढदिवस अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला होता. मुंबई व गुजरातवरून येणाऱ्या नातेवाईकांची सरबराई करण्याची सर्व जबाबदारी जरीनावरच होती. पहिला वाढदिवस साजरा करण्याचा अट्टाहास जरीनाचाच असल्यामुळे नवसारी सारख्या गावात एवढ्या छोट्या घरात आनंद सोहळा करायचा म्हणजे जरीनाचं खरंच कौतुक केलं पाहिजे होतं. जरीन एका शाळेत शिक्षिका होती आणि तिचा नवरा कावस पारशी अग्यारीत दस्तुर होता. दोघेही आपल्या लहानशा संसारात नव्या पाहुण्याच्या स्वागतासाठी आतुर असताना, बरेच वर्षांनी त्यांना एक सुस्वरूप, देखणी, अंगाने गोरी पिट्ठ, बार्बी डॉलसारखी डायना नावाची मुलगी झाली. डायना सर्वांकडून कोडकौतुक करून घेण्याजोगी होती. वाढदिवसादिवशी तर तिच्या सौंदर्याची तारीफ करण्याची जणू चढाओढच लागली होती. सर्व आप्तेष्टांनीमिळून तिचा वाढदिवस असा काही दणक्यात साजरा केला की, जरीनच्या घरात गेल्या दहा वर्षात असा समारंभ कधी झाला नसेल. मुंबईहून दोन दिवसांकरीता आलेला तिचा मैय्यामामा तर तिचे रूप बघून विरघळूनच गेला होता. तिच्याशी लड करता करता तिचे हसणे, लूकू लूकू बघणे, रांगताना चपळतेने सरकत असताना पटकन उभे राहण्याचा प्रयत्न करण्याची तिची प्रगती पाहून तो खूश झाला होता. दोन दिवसाच्या मुक्कामात एक गोष्ट मात्र त्याच्या नजरेतून सुटली नव्हती की डायनाला हाक मारून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केल्यावर तिचा प्रतिसाद मिळत नसे. किंबहूना बालवयातले तिचे बोबडे बोल उच्चारणेही तिला जड जात होते. मैय्याने समारंभात जमलेल्या नातेवाईकांसमोर रंगाचा भंग होऊ नये म्हणून ही गोष्ट आपल्या मनातच ठेवली होती. वाढदिवस साजरा होऊन जसे एक एक नातेवाईक आपापल्या घरी परतू लागले तसे मैय्याने जाताना आपल्या बहिणीला एका बाजूला घेऊन डायनाची ही कमतरता तिच्या कानावर घालून, त्याने इ. एन. टी. डॉक्टरांचा त्वरीत सल्ला घेऊन शंकेचं निरसन करण्याचं आवर्जून सांगितलं. हे ऐकल्यावर जरीनचा चेहरा खाडकन् उतरला खरा, परंतु दररोज खेळताना ही गोष्ट तिच्याही लक्षात आली. जशी मोठी होईल तशी ही उणीव आपोआप दूर होईल असा तिचा भाबडा विश्वास होता. मनात कुठलीही शंका उरायला नको म्हणून दुसऱ्याच दिवशी कावसला आणि ती नवसारीतील प्रसिद्ध इ. एन. टी. डॉक्टरकडे तपासणीसाठी डायनाला घेऊन गेली. जरीनने जरा घाबऱ्या घुबऱ्या स्वरातच डॉक्टरांना सांगितले, ''डॉक्टर, जरी टाळी वाजवली तरी डायना प्रतिसाद न देता एक टक सरळच बघत बसते. म्हणून खातरजमा करण्यासाठी तिला चेकींगसाठी इथे आणले आहे.'' कान, नाक, घसा तपासत असताना डॉक्टरांचा चेहरा एकदम गंभीर झाला. मिसेस जरीन, घसा खाकरत डॉक्टर म्हणाले, 'मला वाटतं, वेळ न दवडता मुंबईच्या पारसी जनरल हॉस्पिटलमधील नामवंत डॉक्टर वाडीयांकडे हिला घेऊन जावं. तसं घाबरण्याचं कारण नाही, मी तुम्हाला चिठ्ठी लिहून देतो. जेवढ्या लवकर जाल तेवढ्या लवकर गुण येईल, परंतु ही केस काही साधी नाही....' जरीन अन् कावसच्या डोक्यावर जणू आभाळंच कोसळलं! जरीनने तर गेले दोन दिवस डायनाच्या विचारांनी अन्नपाणी सोडलं. तिची सर्व गोष्टींवरची वांछाच उडाली. गॅलरीत एकटीच बसून भर पावसात बोडका झालेला समोरचा गुलमोहर न्याहाळत, कधी एकदा नव्या वैशाखातल्या उन्हाळ्यात फुलापानाने बहरेल या विचाराने हरवून जाऊन आपल्या मनाच्या संवेदनाशी ती मेळ घालू लागली.... !

मुंबईला कावसच्या बहिणीच्या मदतीने तसेच जाताना त्याने अग्यारीतील मुख्य दस्तुर आतश बेहरामकडून घेतलेले काही पैसे आणि जरीनने शाळेतून काढलेलं कर्ज व होते नव्हते ते दागिने विकून जमवलेले पैसे गोळा करून त्याने मुंबई गाठली. पारसी जनरल हॉस्पिटलचे डॉक्टर वाडीयासुद्धा एक देवमाणूस निघाले. त्यांनी सर्वतोपरी नीट तपासण्या करून डायनाच्या योग्य ट्रिटमेंटसाठी परिश्रमाची पराकाष्ठा केली. परंतु कानाच्या पडद्यामागील अंतर्गत बिघाडामुळे तिचे ऐकणे व बोलणे खुंटले होते हे निदान समजल्यावर, अशा तऱ्हेचे ऑपरेशन करून कानाखाली एक छोटेसे यंत्र बसवण्यात ऑस्ट्रेलियातील त्यांच्या ओळखीचे एकमेव तज्ज्ञ डॉक्टर वाडीयाने त्यांना सुचविले. जरीन व कावसच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेऊन, डॉक्टर वाडीयाने त्या लोभस व गोंडस निरागस मुलीचा आयुष्याचा विचार करत एक सल्ला दिला, ''मला खात्री आहे की ऑस्ट्रेलियासारख्या देशात तुमची ओळख असणं दुर्मिळ आहे. तरी ह्या सुंदर भाबड्या मुलीकडे पाहून मी माझी ओळख पणाला लावून तिथे स्थायिक असलेले एक वृद्ध व श्रीमंत पारसी जोडपे दिनशाशेट व मेहरामाय यांच्याकडे, तुम्हा सर्वांची राहण्याची व्यवस्था करतो.'' जरीनाने डॉक्टर वाडियाच्या प्रस्तावास लगेच

होकार दिला. डायनासाठी ती काही करण्यास तयार होती. खरंच, अज्ञानात सर्वांनाच किती सुखद वाटतं! अदृष्याची चाहूल लागली असती तर माणसं नुसत्या काल्पनिक भयानेच वेडीपिशी झाली असती. डायनाचं सौंदर्याचं पात्र असं ओसंडून वाहत असताना प्रारब्ध तिला वाकुल्या करून खिजवत होते! डोळ्यापूढे एकच उद्देश ठेवून जरीन व कावसने डॉक्टर वाडीयांचे मिळालेलं पाठबळ व पारसी पंचायत ट्रस्टच्या कृपेने मिळालेली दातृत्वाच्या भरगोस आर्थिक मदतीच्या बळावर डायनाला घेऊन जरीन व कावसने ऑस्ट्रेलिया गाठलं. तिथे दिनशासेठ व त्यांची पत्नी मेहरमाय यांनी त्यांचे स्वागत केले. ऑस्ट्रेलियात पारसी समाजातील कोणीच आप्तेष्ट न भेटल्यामुळे ह्या दोघांना बघून त्यांच्या भावभावना दाटून आल्या. डायनासह दोन्ही कुटुंबांची तोंडओळख झाली. दिनशाशेठने डॉ. वाडीयाने सांगितल्याप्रमाणे लागलीच तिकडच्या निष्णात इ. एन. टी. डॉक्टरची अपॉइंटमेंट अगोदरच घेऊन ठेवली होती. त्यांनी कान घसा तपासल्यावर पहिल्या भेटीतच डायनाच्या वैगुण्याची त्यांना पूर्ण कल्पना आली. त्यांनी असा सल्ला दिला की, 'ह्याच हॉस्पिटलमध्ये डायनाचे कानाचे ऑपरेशन करून, एक यंत्र आत बसवावे लागेल आणि तिला इथे आठ दिवस राहावे लागेल. त्यासाठी जवळपास दहा लाख रुपये खर्च येईल,'' हे सांगण्यासही ते विसरले नाहीत! दहा लाख रुपये खर्च येणार हे ऐकून जरीनच्या तोंडचे पाणीच पळाले. सुख येताना एकटंच असतं, दुःख मात्र सखे-सोबती घेऊन येतं असं म्हणतात हे खरंच आहे. प्रारब्धाने लादलेलं हे दुःख कमी होतं म्हणून की काय परदेशात येऊन खाली हाताने परत फिरावं लागणार अस जरीनला वाटू लागलं. परंतु तिच्या मनाचा निग्रह होता - Stay strong there is a Rainbow after every storm. मधल्या काळात मेहरमायची विकलांग अवस्था लक्षात घेता सैंपाक घराची सर्व जबाबदारी जरीनने घेऊन सर्वांना उत्कृष्ट जेवण करून घातले. त्याचप्रमाणे जरीन व कावस, घरची सर्व कामे करून आपल्या आई-वडिलांप्रमाणे त्यांची मनापासून सेवा करीत होते. मेहरमाय व दिनशाशेट यांना सुद्धा डायनाच्या बाळ-लीला पाहून तिचा लळा लागणे साहाजिकच होतं. ह्याचा परिणाम असा झाला की, त्यांची परिस्थिती ओळखून दिनशाशेटने ऑपरेशनच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली आणि ठरल्या तारखेला, ठरल्या वेळी डायनाचे ऑपरेशन सुरळीत पार पडले! गेले आठ दिवस डायनाला बरं वाटावं म्हणून सर्वांनी जीवाचा आटापिटा केला होता. ...तो सोमवारचा दिवस होता. डॉक्टर सकाळीच हॉस्पिटलमध्ये आले. त्यांनी डायनाच्या कान-नाक-घसा यांची तपासणी केली आणि, अहो आश्चर्यम्! डॉक्टरांनी जाहीर केले की डायना पूर्ण बरी झाली आहे! हेच ऐकण्यासाठी जरीन व कावसचे कान आसुसले होते. - ह्याचसाठी केला होता अट्टाहास, परिणाम गोड व्हावा! त्यांची सोन्यासारखी गोडगोजीरी, डायनाचे संकट आज खऱ्या अर्थाने टळून त्या दोघांना ''सोनियाचा दिस आजी अमृते पाहिला'' असे झाले. दोघांचेही चेहरे आनंदाश्रुंनी धबधबलेले होते. जरीनाला, शाळेत मुलांना शिकवलेल्या एका वाक्याची आज आठवण झाली, Every dark night is followed by a bright day! डायनाला हळूहळू ऐकू येऊ लागलं. ती बोलूही लागली. काही दिवस फॉलो-अप संपल्यावर डॉक्टरांनी डायनाला भारतात जाण्याची परवानगी दिली. नाही तरी, दोन महिन्यांचा व्हिसा संपत आला होता. त्यामुळे भारतात परतणे अटळच होतं. त्या दोन महिन्यांच्या कालावधीत जरिन व कावसने मेहरमाय व दिनशासेटची सेवा केल्यामुळे आणि जरीन-कावसला आर्थिक मदतीचा हात मिळाल्यामुळे दोघांमध्ये एकमेकांबद्दल कृतार्थतेची भावना होती. अखेर निरोप घेण्याचा क्षण आला. मेहरमाय व दिनशाशेट काही दिवसा अगोदरच मनाने खचून गेले होते. देवमाणसांसारखे हे वृद्ध जोडपे आभार मानण्यापलीकडचे होते. दाटून आलेल्या भावना न दाखवता दु:खित अंत:करणाने कावस कुटुंब आपल्या घरी परतले. जरीन आपल्या शाळेत रुजू झाली, कावस अग्यारित नित्य नियमाने जाऊ लागला. नित्यनियमाने ऑस्ट्रेलियाहून मेहरमाय व दिनशासेठच्या येणाऱ्या फोनवरून डायनाच्या लागलेल्या प्रेमापोटी त्याचे एक एक दिवस असहाय जात होते. खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनात पोकळी निर्माण झाली. काही महिन्यानंतर अचानक दिनशाशेटची ई मेल आली. ''तुम्ही ऑस्ट्रेलियातून जाऊन काही महिने झाले असतील. परंतु तुमच्या आठवणीने इथे आम्ही हतबल झालो आहोत. विचाराअंती आम्ही दोघांनी असा निर्णय घेतला आहे की डायनाशिवाय आम्ही जगूच शकत नाही. तीची आम्हाला पदोपदी आठवण येत आहे. आम्ही ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे ऑस्ट्रेलियन गव्हर्नमेंटकडे तुमच्या कुटुंबासाठी परमनंट व्हिसाचा बंदोबस्त केला आहे. जर आम्ही डायनाच्या आजारपणात मदत केल्याची भावना असेल तर आता आमची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी, भारत सोडून ताबडतोब ऑस्ट्रेलियात येण्याचा विचार करावा अशी आमची कळकळीची विनंती आहे. मी माझ्या वकीलाचा सल्ला घेऊन माझा बंगला व प्रॉपर्टी, तुम्ही इथे स्थायिक झाल्यानंतर डायनाच्या नावावर करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्याचे मी ठरविले आहे.''... त्या दोघांनी आपल्या पडत्या काळात केलेल्या उपकाराची परतफेड समजून, डायनासह ते ताबडतोब ऑस्ट्रेलियास रवाना झाले. त्यांना बघून दिनशाशेट व मेहरमाय कृतकृत्य झाले. डायनाला हृदयाशी

घेऊन त्याने आपल्या भावनांना वाट करून दिली. त्यानंतर चांगली दोन वर्षे दोघांची वृद्धावस्थेत सेवा करण्याचे भाग्य लाभल्यानंतर बाथरूममध्ये पडल्याचे निमित्त होऊन, एके दिवशी मेहरामायने अखेरचा श्वास सोडला. तीन महिन्यातच दिनशाशेटचे निधन झाले. त्यांच्या कृपेने जरीना व कावस ऑस्ट्रेलियात डायनासह सुखाने कालक्रमण करीत होते. डायनाच्या शारीरिक वैग्युण्याने मिळालेलं निराळं वळण. यामुळे त्यांचे आयुष्यच बदलुन गेले होते. जीवनाच्या कालखंडात डायनामुळे जरी स्थित्यंतरे झाली असली, तरी आज खऱ्या अर्थाने ''मुलगी झाली-प्रगती झाली'' ह्या वाक्याची अनुभूती नव्याने कळली होती! कालच डायनाचा पाचवा वाढदिवस तिच्या मित्रमंडळीसह साजरा झाला. आता ते ऑस्ट्रेलियन नागरिकत्व घेऊन चांगलेच रुळले होते...

मातृभूमीची ओढ काय वेगळीच असते! बरेच वर्षानंतर काही दिवसासाठी म्हणून उन्हाळ्यात त्यांनी नवसारीला आपल्या जुन्या घरी जाण्याचा विचार केला. वास्तुत पोहचताक्षणी भावनावश झालेल्या जरीनाने दारे-खिडक्या उघडल्यावर प्रथम जरीनाचं लक्ष कुठे गेले असेल तर गॅलरीतून दिसणाऱ्या त्या गुलमोहर वृक्षाकडे! ऐन उन्हाळ्यात बहरलेला, पाना-फुलांनी डवरलेला गुलमोहर वृक्ष पाहून, तिच्या मनात अनंत संवेदनांना हसू फुटलं! हळुवार काळीजधागा गुंफण्यासाठी ईश्वराने माणसाच्या आयुष्यात एकदा तरी गुलमोहराचं झाड व्हावं अन्यथा Life is beautiful असतं हे कधी आपल्याला समजणारच नाही!! जणू ते आनंदाचं झाड जरीनकडे बघुन हसत होतं.

**माधव नाडकर्णी, मुंबई**

**६५/१४ मो. ९८१९०८४३८०**

☺ **जलनेवाले जलाकरे-**

''मंदे ऽ ऽ लक्ष कुठाय तुझं?'' सासूबाई पूजा करता करता ओरडल्या-कसल्यातरी विचारात गर्क असलेली मंदा भानावर आली अन् तव्यावरची जळलेली पोळी खाली काढून टाकत खुदकन् हसली.'' ''आता हसतेस काय?'' सासू चिडून म्हणाली-

काही नाही. काल पुष्पाकाकू म्हणत होत्या ते आठवलं- म्हणाल्या मंदे ''छान देखणा नवरा पटकावलायस तू हं! कॉलनीतल्या सगळ्या जणी जळताहेत तुझ्यावर''. खरंतर मुलाबद्दल कौतुकाचे बोल ऐकून त्या खुश झाल्या पण लटक्या रागात म्हणाल्या ''अग कॉलनीतल्या बायकाच काय पण तुझ्या पोळ्या पण जळताहेत! तीन पोळ्या जळाल्या तुझ्या.''

**मधू रानडे, नाशिक**

## संभ्रम

अबोल ह्या मनातुनी गीत एक स्फुरते
मोहरल्या गीतातुनी मी अर्थ शोधते ।।धृ।।

वाटेवरूनी त्या अर्थाच्या जीवन माझे चालते
दृष्टीच्या टप्प्यातील एक मार्ग आक्रमिते
तिथवर मी पोहचता एक सत्य उलगडते
मार्ग नाही संपला पाऊलवाट फुटते
त्या वाटेवर बासरीचे
स्वर मी आळविते ।।१।।

नवे वळण नव्या दिशा नवे क्षितिज दिसते
संभ्रमित मन माझे जुना अर्थ विसरते
नवी वाट पाहता जुने गीत स्मरते
नव्या नव्या वळणांवर नवा अर्थ फुलविते
अर्थाच्या धुंदीत मी मग
मार्ग हा विसरते ।।२।।

खरंच का वाट जुनी अस्तित्वात होती?
जुना सुद्धा अर्थ कधी सार्थ म्हणत होती?
दृष्टीकोन जसा तसा जीवनपट उलगडतो
नजरेचा कुंचला अर्थ-रंग भरतो
रंगुनी त्या नजरेने
नित्य नवे पाहते ।।३।।

११/१३ - **सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर,** विरार

## मी

मी तुझ्या कक्षेत येता
तू असा का स्तब्ध होतो?
चोरून मी तुज पाहताना
तू असा का मुग्ध होतो?

पिऊनी तुझे रूप घेता
शल माझा लुप्त होतो
रोखुनि तुजकडे पाहताना
मीच का मुग्ध होतो?

तु तुझ्यात मग्न असता
मी कटाक्ष गं अपेक्षितो
मजकडे पाहशील म्हणुनी
हास्य मुखावर ठेवितो

**कल्पना कोठारे (सांताक्रुझ)**

**६७/१४ दूरध्वनी : ०२२-२६१०४५५२**

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2014-2016
Licence to Post without Prepayment No.WPP - 22 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month

## कृतार्थ

कशी होऊ उतराई शब्द भासती अपुरे मजला।
ऊर येतसे दाटून सूर कंठात अडकला।।
अलगर मायेचे थोपटणे तुझे जीव सुखावला।
अश्रूभरल्या नेत्राचा मोती गाली ओघळला।।
एक एक पाकळी उलगडता सुवास भरून दरवळला।
फुलांची परवरण पसरताना तरूवरही लाजून गेला।।
काळजातील प्रेमझरा चिंब भिजवून टाकी तनूला।
कोसळताना पाऊसही क्षणभरी स्तिमित झाला।।
तुझ्यासवे ठार चालताना हात हाती विसावला।
आश्वासक तुझी नजर स्पर्शून भिडते मनाला।।
रोज नवा रंग भरता संसारी दु:खाचा विसर पडला।
फुलून येता आसंमत दाही दिशा उजळल्या।।
जन्मजन्मांतराचे आपुले नाते राहो सदैव अभंग।
दृष्ट न लागो कोणाची या विचारात मी दंग।।

११/१४ सौ.सुलभा दाते (बोरीवली)
दूरध्वनी : २ ८३३५७६३

## इतके का आवडता?

इतके का आवडता
प्रश्न तुझा ठरलेला
उत्तर मी देऊ काय
प्रश्न सखे मज पडला
आवडतो चंद्र तुला
पुसशील का चंद्राला
रे चंद्रा इतका का
आवडशी सांग मला
आवडते पुष्प तुला
पुसशील का पुष्पाला
आवडशी का पुष्पा
म्हणेल ते प्रश्न खुळा
आवडते जे तुजला
आवडते हृदयाला
का इतका आवडतो
पूस तुझ्या प्रितीला

१३/१४ मधुकर सुळे (कुर्ला)
मो. ८९७६२३९३८७

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.